आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक २० एप्रिल २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्वाचे पाऊल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन पात्र महिलांना 50 पिंक ई-रिक्षांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपूरात वितरण

2. केंद्र सरकारच्यावतीने 15 हजार चालक पशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती नागपूरच्या सावरमेंढा येथे चालक प्रशिक्षण केंद्राचे आणि स्वयंचलित तपासणी केंद्राचे केले भूमिपूजन

3. फ्रान्समधे होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर', 'खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या चार मराठी चित्रपटांची निवड

4. विदर्भात नागपूर 44 पुर्णांक 7 अंश सेल्सिअससह सर्वात उष्ण, उद्या आणि परवा नागपूर, वर्धा,चंद्रपूर, अकोला येथे उष्णतेच्या लाटेची शक्यता

<u>पिंक ई-रिक्षा</u>

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्यामाध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरात केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला. नागपूरच्या सदर येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील 50 पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगि महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर उपस्थित होते.नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. या राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले

*आज मेट्रोसोबत देखील एक करार होतो आहे ज्यामुळे मेट्रो स्टेशन्सवर फिडर सर्व्हिस म्हणून या ई रिक्षा त्या ठिकाणी ठेवता येतील आणि आदिती ताईंनी जे सुचवलं की पर्यटनाच्या स्थळांवर किंवा इतरही ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या फिडर सर्व्हिसेसची आवश्यकता*

*आहे तिथे पिंकी इ - रिक्षाला प्राधान्य देण्यात यावं तर मी निश्चितपणे तशा प्रकारच्या सूचना या परिवहन विभाग असेल किंवा पर्यटन विभाग असेल या दोन्ही विभागांना देईल*

या योजनेंतर्गत पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांत महाराष्ट्र शासनाकडून इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व ई-रिक्षा चालवण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यात नागपूर जिह्यामध्ये 2000 महिलांना पिंक ई-रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे.

<u>चालक प्रशिक्षण केंद्र</u>

देशात सध्या 22 लाख प्रशिक्षित चालकांची कमतरता असून केंद्र सरकारच्यावतीने 15 हजार चालक पशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल नागपूरमध्ये दिली. केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त चालक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन आणि स्वयंचलित तपासणी केंद्राचे भूमिपूजन गडकरी यांच्या हस्ते काल शनिवार रोजी सावरमेंढा तालुका सावनेर जिल्हा नागपूर येथे पार पडले. या कार्यक्रमाला राज्यमंत्री मा. डॉ. पंकज भोयर, यांची प्रमुख उपस्थिती होती.राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी भारतातील या पहिल्या सेंटरमाधून निश्चितपणे चांगले ड्रायव्हर तयार होतील, असा विश्वास व्यक्त केला यावेळी 'हसत खेळत सोप्या भाषेत ड्रायव्हिंग शिका' या पुस्तकाचे प्रकाशन नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले.

<u>वेव्हज</u>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वेव्हजच्या निमित्तानं देशभरातल्या प्रसार माध्यमांतल्या वरिष्ठांशी संवाद साधला. बदलत्या तंत्रज्ञानानुसार नवनवीन गोष्टी आपल्यासमोर येत आहेत. या नव्या गोष्टींसाठी तयार राहण्याकरता एकत्रित प्रयत्न करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. चांगल्या दर्जाच्या कलाकृतीची निर्मिती आता देशाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून होऊ शकते आणि त्याला प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. येत्या १ ते ४ मे २०२५ रोजी मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेसाठी १ लाखांहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे. यात होणाऱ्या विविध स्पर्धांमधल्या विजेत्यांना पुरस्कार देऊन गौरवलं जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान (वेव्हज) २०२५ साठी माध्यम प्रतिनिधींसाठी नोंदणी तीन दिवसांसाठी पुन्हा सुरू करण्यात येत आहे - २१ एप्रिल (सोमवार), २२ एप्रिल (मंगळवार) आणि २३ एप्रिल (बुधवार). रोजी नोंदणी अर्ज करण्याची मुदत वाढवण्यात आली आहे.

## कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

फ्रान्समधे होणाऱ्या कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर','खालिद का शिवाजी' आणि जुनं फर्निचर या चार मराठी चित्रपटांची निवड झाली आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव होत आहे. महोत्सवासाठी पाठवण्यात येणाऱ्या चित्रपट निवडीसाठी तज्ज्ञांची समिती नेमली होती. त्यात आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.

## हवामान

आज विदर्भात सर्वात जास्त तापमानाची नोंद नागपूर येथे 44 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस करण्यात आली आहे विदर्भातील सर्वच जिल्ह्याचे तापमान 40 अंश सेल्सिअसच्या वर आहे .दरम्यान नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने उद्या आणि परवा नागपूर, वर्धा,चंद्रपूर, अकोला येथे उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली आहे.

## आयपीएल

पंजाबच्या मुल्लानपूर येथील महाराजा देवेंद्र सिंग क्रिकेट स्टेडियम मध्ये चालू असलेल्या पंजाब किंग इलेव्हन आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांच्यातील सामन्यात पंजाब किंग्जने आरसीबी समोर 157 धावांचे आवाहन ठेवले आहे. आरसीबी तर्फे कृणाल पांड्या आणि सुयश शर्मा यांनी प्रत्येकी दोन दोन गडी बाद केले . शेवटचे वृत्त हाती आलं तेव्हा बेंगलोरच्या 1 गडी बाद 60-धावा झाल्या होत्या.आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज रात्री साडेसातला मुंबईच्या वानखेडे स्टेडीयममध्ये मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे सामने होत आहेत. स्पर्धेत सध्याच्या अद्ययावत आकडेवारीनुसार क्रमवारीत चार संघ दहा गुणांसह आघाडीवर आहेत मात्र धावांच्या सरासरीचा विचार करता गुजरात टायटन्स पहिल्या, दिल्ली कॅपिटल्स दुसऱ्या,पंजाब किंग्ज तिसऱ्या तर,लखनऊ सूपर जायन्टस चौथ्या स्थानावर आहेत.

## पोषण पंधरवडा

वाशिम जिल्ह्यात गेल्या आठ एप्रिलपासून पोषण पंधरवडा सुरू झाला असून यात जिल्हा परिषद एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयातर्फे विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. जागरूकता निर्माण करणे, सकस आहार, कुपोषण आणि संबंधित समस्या कमी करणे

ही याची उद्दीष्टं असल्याचं प्रशासनातर्फे कळवण्यात आलं आहे. वाशिमध्ये चालू असलेल्या पोषण पंधरवड्याबाबत माहिती प्रकल्प अधिकारी संजय गणवीर यांनी दिली.

*दिनांक ८ एप्रिल ते २२ एप्रिल २०२५ या दरम्यान वाशिम जिल्ह्यातील एकून ग्रामीण आणि शहरी भागातील एकूण १२ ते ६६ अंगवाडी केंद्रांमध्ये पोषण पंधरवड्याअंतर्गत आपण विविध कार्यक्रम आयोजित करतो. आपल्या शासनाने ठरवून दिलेले चार इंडिकेटर्स आहे. एक हजार दिवस बाळाचे यावर लक्ष केंद्रित करणे, पोषण ट्रॅकरमध्ये लाभार्थी मोड्युल लोकाभिमुख करणे, कॅम्प मोड्युलनुसार कुपोषणानुसार अगदी व्यवस्थित व्यवस्थापन करणे आणि मुलांमधील लठ्ठपणा कमी करण्यासाठी निरोगी जीवनशैली.अशा प्रकारे अवलंबावी या चार मुद्द्यांवर घेऊन आपण हा पंधरवडा साजरा करत आहोत.*

दरम्यान केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाच्या वर्धा येथील केंद्रीय संचार ब्युरोच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील चातगाव येथे सुभेदार रामजी बहुउद्देशीय संस्था चंद्रपूर या कलापथका द्वारे पोषण अभियान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

## जनता दरबार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित जनता दरबारात जनतेच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या निराकरणासाठी विविध विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या. त्यांनी या जनता दरबारात एकूण 626 निवेदने स्वीकारली. सिव्हिल लाईन्स परिसरातील हैदराबाद हाऊस या मुख्यमंत्री सचिवालयात फडणवीस यांची दिव्यांग, महिला,विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या समस्या सांगून निवेदन दिले. त्यांचे म्हणणे ऐकून घेत मुख्यमंत्री यांनी जनतेच्या समस्या सोडवण्याबाबत आश्वस्थ केले. दुपारी 12 ते 3 दरम्यान या जनता दरबारात जवळपास 2 हजार नागरीक सहभागी झाले होते.

*****